Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College of Arts, Science and Commerce, Baramati (Autonomous)

## Programme/Activity Reporting format

| Sr. No. | Item | Particulars |
|---|---|---|
| 1. | Name of the Department/Committee | मराठी, विद्यार्थी विकास मंडळ आणि राष्ट्रीय सेवा योजना. |
| 2. | Title of the Programme | महसूल सप्ताह निमित्त युवा संवाद कार्यक्रम |
| 3. | Date of the Programme | गुरुवार, ०2 ऑगस्ट २०२३ |
| 4. | Name and address of the resource person | माननीय श्री. गणेश शिंदे, तहसीलदार बारामती. |
| 5. | Level of the Programme: College/University/State/National | महाविद्यालय |
| 6. | Funded by: College/University etc. | महाराष्ट्र शासन |
| 7. | Number of Beneficiaries | ५०० |

**Detail information of the programme/activity:**

- **Attached Separate Report -**

**Program Coordinator** **Head** **IQAC Coordinator** **Principal**

**Enclosures:**

1. Permission letter of the Principal
2. Notice
3. Attendance
4. Copy of Feedback forms
5. Total 4 Geo-tagged photographs with captions: Inauguration (1), during programme (2) & Valedictory (1).

Scanned with OKEN Scanner

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# तहसीलदार बारामती यांचे कार्यालय, जि.पुणे

फोन व फॅक्स नंबर :०२११२ २२४३८६ ईमेल : tahsildarbmt@gmail.com

सत्यमेव जयते

जा.क्र./फौज-२/कावि/५५ /२०२३ बारामती, दिनांक – २७/०७/२०२३

प्रति,

प्राचार्य ,
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती, जि. पुणे

**विषयः महसूल सप्ताह साजरा करणेबाबत.**

**संदर्भ : - मा. जिल्हाधिकारी कार्यालय, (महसूल शाखा) पुणे यांचेकडील क्र.पमट /कावि/७९९/२०२३, दि.१३/०७/२०२३**

२/-उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन कळविणेत येते की, सन २०२२-२०२३ या वर्षी १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट २०२३ या कालावधीमध्ये महसूल सप्ताह साजरा करणेत येत असून त्याअनुषंगाने महसूल विभागातर्फे दि. ०२ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता आपले महाविदयालयामध्ये मा. उपविभागीय अधिकारी सो, बारामती उपविभाग बारामती यांचे अध्यक्षतेखाली **"युवा संवाद"** या कार्यक्रमाचे आयोजन करणेत येत आहे. सदर कार्यक्रमामध्ये विदयार्थ्यांना दहावी/ बारामती उत्तीर्ण झालेनंतर पुढील शिक्षणासाठी विविध संस्थांमध्ये प्रवेश घेणेकरिता आवश्यक असणाऱ्या दाखल्यांची माहिती तसेच सदर दाखले काढणेसाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची माहिती, शासनाच्या विविध शिष्यवृत्त्यांची माहिती देणेत येणार आहे. तरी सदर दिवशी कार्यक्रमाकरिता आपले महाविदयालयाचे सभागृह उपलब्ध करून देणेत यावे. तसेच आपले शाळेतील/कॉलेजमधील सर्व विदयार्थ्यांना सदर कार्यक्रमास उपस्थित राहणेबाबत आव्हानित करणेत यावे.

तहसीलदार बारामती

प्रा. डॉ. सीमा गोसावी कार्यक्रमाचे नियोजन करावे.
28/7/23

प्रत : - मा. जिल्हाधिकारी सो, महसूल शाखा , पुणे

प्रत : मा. उपविभागीय अधिकारी सो, बारामती यांना माहितीस्तव सविनय सादर

प्रत : गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती बारामती

२/- सदर कार्यक्रमाकरिता आपलेकडील शिष्यवृत्ती योजना तसेच शालेय, महाविदयालयीन विदयार्थ्यांसाठी असणाऱ्या योजनांची माहिती देणेकामी आपण उपस्थित रहावे.

28/7/23

तु.च.कॉलेज,बारामती
आवक नंबर:
दिनांक: 28 JUL 2023

Scanned with OKEN Scanner

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

# NOTICE

नोटीस क्र. -156

दि. ३१/०७/२०२३

## विद्यार्थ्यांसाठी सूचना
## 'युवा संवाद' कार्यक्रम

आपल्या महाविद्यालयात मा. जिल्हाधिकारी कार्यालय (महसूल शाखा) पुणे यांच्याकडून प्राप्त झालेल्या सूचनेनुसार तहसील कार्यालय व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महसूल सप्ताह १ ऑगष्ट २०२३ या कालावधीत पाळला जात आहे. यानिमित्ताने होणाऱ्या 'युवा संवाद' कार्यक्रमात बुधवार दि. २ ऑगस्ट २०२३ ते ७ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ११.३० वा. मा. वैभव नावडकर (उपविभागीय अधिकारी, बारामती, उपविभाग बारामती) हे विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत.

- सदर कार्यक्रमात पुढील विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळेल.
  १) १० वी व १२ वी उत्तीर्ण झालेनंतर पुढील शिक्षणासाठी विविध संस्थांमध्ये प्रवेश घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती.
  २) दाखले काढण्यासाठी आवश्यक कागदपत्रे
  ३) शासनाच्या विविध शिष्यवृत्ती

तरी या कार्यक्रमाचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन करणेत येत आहे.

- स्थळ – जीवराज सभागृह
- वेळ – सकाळी ११.३० वा.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\rmmane\Junior 2023-24\Notice - 23-24.docx

Scanned with OKEN Scanner

पुढारी

# टीसी महाविद्यालयात युवा संवाद

बारामती : पुढारी वृत्तसेवा

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात महसूल सप्ताहानिमित्त युवा संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयातील विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना व जिल्हाधिकारी कार्यालय, महसूल शाखा बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

दहावी-बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या उत्पन्नाचा दाखला, जातीचे प्रमाणपत्र, रहिवास दाखला, शिष्यवृत्तीची माहिती देण्यात आली. बारामतीचे तहसीलदार गणेश शिंदे यांनी युवकांशी संवाद साधला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अविनाश जगताप होते.

तहसीलदार शिंदे यांनी, सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रमाची तयारी ठेवावी. चांगल्या मित्रांची संगत ठेवावी. अधिकाधिक शिक्षणाचे ध्येय बाळगावे. तंत्रज्ञानातील नवनवीन गोष्टी अवगत करून स्वतःला अद्ययावत ठेवा, असे आवाहन केले. बारामतीचे गटशिक्षणाधिकारी संपत गावडे यांनी शिष्यवृत्तीबाबत मार्गदर्शन केले. त्रिंबक ताम्हाणे यांनी विविध योजनांची माहिती दिली.

प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी विद्यार्थ्यांसाठी नव्याने सुरू केलेल्या उपक्रमांची माहिती दिली. शिक्षण विस्तार अधिकारी नवनाथ कुचेकर, सागर गायकवाड, अतुल मोरे आदी या वेळी उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी डॉ. विलास कर्डिले यांनी या कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले. ५०० विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. प्रास्ताविक कला शाखा अधिष्ठाता डॉ. सीमा नाईक गोसावी यांनी केले. उपप्राचार्या प्रा. वैशाली माळी यांनी आभार मानले.



टी. सी. महाविद्यालयात आयोजित युवा संवाद कार्यक्रमात मार्गदर्शन करताना तहसीलदार गणेश शिंदे.

My Gramin Edition
Aug 8, 2023 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

Scanned with OKEN Scanner

अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे,
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती
(कला, विज्ञान व वाणिज्य)
(स्वायत्त)

# महसूल सप्ताहानिमित्त युवा संवादकार्यक्रम

## अहवाल

---

**मा. प्राचार्य, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती यांना सादर...**

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात महसूल सप्ताहानिमित्त युवा संवादकार्यक्रम महाविद्यालयातील विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना व जिल्हाधिकारी कार्यालय, महसूल शाखा बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांना दहावी - बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या उत्पन्नाचा दाखला ,जातीचे प्रमाणपत्र, रहिवासी दाखला इ. कागदपत्रांची माहिती, शिष्यवृत्तीची माहिती देण्यात आली . बारामतीचे तहसीलदार मा. श्री. गणेश शिंदे यांनी युवकांशी संवाद साधला. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर अविनाश जगताप होते.

विद्यार्थ्यांशी बोलताना श्री. गणेश शिंदे यांनी " सध्याचे युग हे स्पर्धेचे व माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रमाची तयारी ठेवावी. चांगल्या मित्रांची संगत ठेवावी. उच्च ध्येय बाळगावे .आई -वडील व शिक्षकांप्रती आदर बाळगावा. मूल्याधिष्ठित शिक्षण घ्यावे व स्पर्धेला सामोरे जावे. तंत्रज्ञानातील नवनवीन गोष्टी अवगत करून स्वतःला अद्ययावत ठेवावे." असे बहुमोल मार्गदर्शन त्यांनी केले.

बारामतीचे पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी मा. श्री. संपत गावडे यांनी विविध शिष्यवृत्ती व दिव्यांग विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना इ. विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्री.त्रिंबक ताम्हाणे यांनीही विविध योजनांची माहिती दिली. अध्यक्षीय मनोगतातून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश जगताप यांनी विद्यार्थ्यांसाठी नव्याने सुरू केलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

पंचायत समिती बारामती विस्ताराधिकारी श्री. नवनाथ कुचेकर, श्री .सागर गायकवाड ,शालेय पोषण आहार योजना अधिक्षक श्री. अतुल मोरे हे मान्यवर यावेळी उपस्थित होते .स्वागत व प्रास्ताविक महाविद्यालयाच्या कला शाखा अधिष्ठाता डॉ.सीमा नाईक - गोसावी यांनी केले. सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. भगवान माळी यांनी केले तर आभार कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य प्रा. वैशाली माळी यांनी मानले. राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी डॉ. विलास कर्डिले यांनी विशेष परिश्रम घेतले. ५०० विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

आपली विश्वासू,

**डॉ. सीमा नाईक - गोसावी**

कला शाखा अधिष्ठाता

Noted
१०/९

Scanned with OKEN Scanner